सकाळ

सकाळ
सातारा, बुधवार
२१ डिसेंबर २०१६
२

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कैद्यांची शरणागती ही ऐतिहासिक कामगिरी : पवार



कोरेगाव : विजय दिवस कार्यक्रमात बोलताना विजय पवार, व्यासपीठावर प्रेरणा कट्टे, हिम्मत खराडे, विजयसिंह सावंत, विष्णुपंत चव्हाण, आनंद शिंदे.

**कोरेगाव, ता. २०** : भारताने आजवर पाकिस्तानसोबत तीन लढाया केल्या. त्यापैकी बांगलादेशाला मुक्त करण्यासाठी केलेल्या लढाईत ९३ हजार कैद्यांना शरण आणण्याची भारतीय सैन्याची कारवाई जागतिक स्तरावर दखलपात्र ठरलेली ऐतिहासिक अशीच होती आणि तो दिवस म्हणजे 'विजय दिवस', असे प्रतिपादन निवृत्त लेफ्टनंट जनरल विजय पवार यांनी केले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये आयोजित विजय दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी पोलिस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे, प्रांताधिकारी हिम्मत खराडे, निवृत्त कर्नल विष्णुपंत चव्हाण, कॅप्टन आनंद शिंदे आदी प्रमुख उपस्थित होते. श्रीमती कट्टे म्हणाल्या, ''विजय दिनाच्या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण झाली पाहिजे. सीमेवर सैनिक संरक्षण करतात म्हणून आपण देशात सुरक्षित आहोत, याची जाणीव ठेवून युवकांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये न अडकता देशप्रेम जागृत करणारे चित्रपट पाहावेत.'' शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही श्री. खराडे यांनी दिली. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक व पी. एस. पवार यांनी सूत्रसंचालन केले. रामभाऊ देवकर यांनी आभार मानले. याप्रसंगी उरी दहशतवादी हल्ल्यातील हुतात्मा सुनील सूर्यवंशी, लान्स नाईक चंद्रकांत गलंडे, तसेच कर्नल संतोष महाडिक, कारगील युद्धातील अतुलनीय कामगिरीबद्दल शौर्यचक्र प्राप्त करणारे कॅप्टन गौरव जाधव, हवालदार सुनील रोमण यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. सैन्य दलातील सेवेत कायमचे अपंगत्व आलेले शिपाई शंकर चतुर, तसेच हुतात्मा सुनील बर्गे, उत्तम फडतरे यांच्या कुटुंबीयांचाही सन्मान झाला. या वेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या तुकडीने शानदार संचलन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी येस एज्युकेशन, जाणीव मित्र समूह, गुरुदत्त अॅकॅडमी, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, तालुका आजी माजी सैनिक संघटना, एक्स डिफेन्स असोसिएशन, प्रा. बाळकृष्ण भोसले, प्रा. द. म. डांगे यांचे सहकार्य लाभले.